<u>प्रेसनोट दि. १५/०६/२०१८</u>

# कोंढवा येथील फ्लॅटवर छापा
## २ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## वेश्याव्यवसाय चालकास अटक

दि.१४/०६/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना पोलीस नाईक नितिन तेलंगे यांचे कडुन माहीती मिळाली की, सं नं ४६/१/१ हेवन पार्क, जरांडे नगर, महंमदवाडी, हडपसर पुणे येथील फ्लॅटमध्ये इसम नामे धनंजय पांडुरंग सुर्यवंशी हा महिलांना वेश्या व्यवसायासाठी प्राप्त करुन घेवुन त्यांना पैशाचे अमिष दाखवुन त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करुन त्यांचे कडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी यांनी कारवाई करून कोंढवा परिसरातील सं नं ४६/१/१ हेवन पार्क, जरांडे नगर, अमीर चिकन दुकाना मागे, महंमदवाडी, हडपसर पुणे येथे चालत असलेल्या फ्लॅटवर वेश्या व्यवसायां बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान २ महाराष्ट्रीन सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा धनंजय पांडुरंग सुर्यवंशी वय ३८ वर्षे सं नं ४६/१/१ हेवन पार्क, जरांडे नगर, अमीर चिकन दुकाना मागे, महंमदवाडी, हडपसर पुणे (वेश्याव्यवसाय चालक) याचे विरुध्द कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३४४/२०१८ इटपा ॲक्ट कलम ३,४,५ सह भादवि कलम ३७०, ३७० (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीला कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ३०००/- रुपये, १ मोबाईल फोन, लाईट बील, इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, सपोनि शीतल भालेकर,नितिन तेलंगे, नामदेव शेलार,राजाराम घोगरे, रमेश लोहकरे, गीतांजली जाधव, कविता नलावडे, तुषार आल्हाट, नितिन लोंढे, सचिन कदम, रेवनसिध्द नरोटे, संदीप गायकवाड, सुनिल नाईक, सचिन शिंदे, रुपाली चांदगुडे, यांनी कारवाई केली आहे.